| | |
|---|---|
| MHRG070005722021 | केस दाखल दिनांक १३/०५/२०२१<br>केस नोंदणी दिनांक १३/०५/२०२१<br>केस निकाल दिनांक ०२/०४/२०२६<br>कालावधी वर्षे महिने दिवस<br>०४ १० २० |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्रीम. ए. एस. वाडकर)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१०१/२०२१**
**निशाणी क्र.१८**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>गुन्हा नोंद क्रमांक : १३४/२०१९, दिनांक २०/०७/२०१९<br>पोलीस स्टेशन : नेरळ पोलीस स्टेशन,<br>ता. कर्जत, जि. रायगड | |
| फिर्यादी | श्री. प्रविण बाळकृष्ण ठाकरे<br>वय : ३५ वर्षे, धंदा :<br>राहणार : डीकसल, पो. कोषाणे,<br>ता. कर्जत, जि. रायगड |
| महाराष्ट्र शासनतर्फे | श्रीम. सरोज नागोठकर, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. सुनिल सुरेश वाघमारे**<br>वय : १९ वर्षे, धंदा : मजुरी,<br>राहणार : हाळ, आदिवासीवाडी, ता. खालापूर<br>जि. रायगड |
| आरोपीतर्फे वकील | श्री. अशोक ओसवाल. |

**(भाग "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०/०७/२०१९ |
| गुन्हा नोंदणी तारीख | २०/०७/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १३/०५/२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चित तारीख | ०१/०४/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १४/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | ०२/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | निरंक |

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | किती शिक्षा दिली | खटला सुरु असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुनिल सुरेश वाघमारे | २६/०२/२०२१ | ०१/०३/२०२१ | भारतीय दंड विधान संहिता कलम ३८० | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## (भाग "क")

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील** :-

### अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रविण बाळकृष्ण ठाकरे | १० |
| २ | केतन सुनिल भोईर | १३ |

### आरोपी पक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :-
**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | फिर्याद व छापील फिर्याद | ११ व १२ |
| २ | पंचनामा | १४ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील** :-

| अ.क्रं. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | एक विवो कंपनीचा सफेद रंगाचा मोबाईल | निरंक |

## न्यायनिर्णय
## (जाहिर दिनांक ०२/०४/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, कलम ३८० अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

०२. दिनांक २०/०७/२०१९ रोजी मौजे, भिवपुरी, डिकसल

येथील फिर्यादी यांचे मालकीचे ठाकरे पे ॲन्ड पार्किंगचे दुकानातून आरोपी सुनिल सुरेश वाघमारे यांनी फिर्यादी यांच्या मालकीचा मोबाईल फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता चोरून नेवून स्वतः वापरीत असताना मिळून आले. त्यामुळे फिर्यादीने सदरची फिर्याद नेरळ पोलीस स्टेशन येथे दिली.

०३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र.१३४/२०१९ भारतीय दंड संहितेचे कलम ३८० अन्वये गुन्हा नोंदविला गेला. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी यांनी केला. तपासामध्ये त्यांनी फिर्यादीचा जबाब नोंदविला, घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, निवेदन पंचनामा तयार केला, साक्षीदारांची टिपणे नोंदविली, मुद्देमाल पावती तयार केली, जप्त मुद्देमालाची कागदपत्रे व मोटार कारची कागदपत्रे हस्तगत केली व तपास पुर्ण होताच आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने वरील कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३८० अन्वये निशाणी क्र.८ प्रमाणे आरोपींचे दोषारोप नोंदविले. आरोपींना गुन्हयाचे विवरण त्यांच्या मातृभाषेत वाचुन व समजावून सांगितले असता आरोपींनी आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. दिनांक १३/११/२०२५ रोजी निशाणी क्र.१७ येथे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

०५. आरोपीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर घटनेबाबत कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. त्यावरुन आरोपींनी गुन्हा केला नसल्याचे सिध्द होते. अशा परिस्थितीत

अभियोग पक्षाचा पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी हे निर्दोषमुक्त होण्यास पात्र असल्याचे दिसुन येते. सदर विधीज्ञांनी आरोपींना निर्दोषमुक्त करण्याची विनंती केली.

०६. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा देऊन आरोप सिध्द केलेले आहेत. साक्षीदारांनी फिर्यादीच्या कथनास अनुसरुन त्यांच्या साक्षीमध्ये कथन केलेले आहे. सरकारी वकीलांनी आरोपीस अभियोग पक्षाचा पुरावा लक्षात घेता शिक्षा करण्याची विनंती केली आहे.

०७. फिर्यादी पक्षाचा पुरावा व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.नं.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले का की, दिनांक २०/०७/२०१९ रोजी मौजे, भिवपुरी, डिकसल येथील फिर्यादी यांचे मालकीचे ठाकरे पे ॲन्ड पार्किंगचे दुकानातून आरोपी सुनिल सुरेश वाघमारे यांनी फिर्यादी यांच्या मालकीचा मोबाईल फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता चोरून नेलात का ? | | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## कारण मिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत** –

०८. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ प्रविण बाळकृष्ण ठाकरे (निशाणी क्रं.–१०) हे फिर्यादी असून यांचे पुराव्यामध्ये असे आले आहे की, त्यांचा भिवपुरी स्टेशनजवळ पे अॅन्ड पार्किंगचा व्यवसाय आहे. सदरचा व्यवसाय ते व त्यांचे मित्र नामे महेश चव्हाण असे चालवित होते. घटना ही दिनांक १९/०७/२०१९ रोजी भिवपुरी स्टेशनजवळ त्यांच्या पे अॅन्ड पार्किंग येथे झाली होती. रात्री ते ११.३० च्या सुमारास झोपले होते. सकाळी ७.०० वाजता उठले. त्यावेळेस बघितले की, त्यांचा मोबाईल व पैसे मिळुन आले नाहीत. त्यांनी त्यांच्या मित्राकडे चौकशी केली असता त्याने त्यांचा मोबाईल व पैसे घेतले नसल्याचे सांगितले. त्यानंतर सीसीटीव्ही बघितला असता चोरी झाल्याचे समजले. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. त्यांचा विवो कंपनीचा व्ही सेवन प्लस हा २ सिमचा मोबाईल होता व एकुण ८,०००/– रक्कम चोरीला गेली होती. त्यांना सदरची फिर्याद व छापील फिर्याद दाखविण्यात आली. सदर फिर्यादीवर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ त्यांनी पोलीसांना पंचनाम्याच्या वेळेस दाखविले होते. घटनेनंतर २ वर्षांनी त्यांना पोलीसांचा फोन आला व त्यांनी मोबाईल मिळाल्याचे सांगितले. दिनांक २६/०२/२०२१ रोजी त्यांना त्यांचा मोबाईल परत मिळाला. कोणी चोरी केली त्याबाबत त्यांना समजले नाही.

०९. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये असे कथन केले की, मोबाईल कोणी चोरला होता याबाबत वैयक्तिक माहिती नाही. मी प्रत्यक्ष चोरीची घटना घडताना पाहिली नाही.

१०. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ केतन सुनिल भोईर (निशाणी क्रं.–१३) हा पंच साक्षीदार असून त्याने त्याच्या पुराव्यात त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा झाल्याचे सांगितले आहे.

११. प्रस्तुत प्रकरणात तपासलेले साक्षीदार क्र.१ व साक्षीदार क्र.२ यांच्या पुराव्यावरुन घटनास्थळावरुन मोबाईल आरोपीने चोरी केल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसुन येत नाही. इतर साक्षीदारांना हजर ठेवण्यात अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. फौजदारी प्रकरणात आरोपीविरुध्द आरोप हे संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणातील एकंदर पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींनी घटनेच्या दिवशी घटनास्थळावर जाऊन चोरी केल्याबाबतचा ठोस पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. अशा परिस्थितीत सर्व आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत** –

१२. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्ष हा आरोपींचा गुन्हा सिध्द करण्यास पूर्णतः अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षान्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | **आरोपी सुनिल सुरेश वाघमारे शेख** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३८० गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया सहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | आरोपींचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणेकरिता आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र द्यावयाचे आहे. |
| ४. | प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आलेला असल्यामुळे त्याबाबत आदेश नाही. |
| ५. | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

Sd/-

दिनांक – ०२/०४/२०२६

**(श्रीमती ए. एस. वाडकर)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड